# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.12.2025** **वारःशनिवार**

---

1. केंद्र सरकारची नव्या 'कोळसा सेतू' धोरणाला मंजुरी
2. विशेष सखोल पुनरीक्षणावर देखरेख ठेवण्यासाठी विशेष मतदार यादी निरीक्षकांची नियुक्ती
3. 2027 मध्ये होणाऱ्या जनगणनेसाठीच्या आर्थिक तरतुदीला मंजूरी आणि
4. फुटबॉल जगतातील दिग्गज खेळाडू लिओनेल मेस्सी भारत भेटीवर.

**कोळसा**

केंद्र सरकारने 'कोळसा सेतू' धोरणाला मंजुरी दिली आहे. या माध्यमातून विविध औद्योगिक वापरासाठी आणि निर्यातीसाठी कोळसा लिलावासाठी एक नवीन संधी निर्माण झाली असून संसाधनाचा न्याय्य वापर करण्यास मदत होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीने काल अखंड, कार्यक्षम आणि पारदर्शक वापरासाठी या धोरणाला मंजुरी दिली. याबाबत काल नवी दिल्लीत मंत्रिमंडळाच्या निर्णयांची माहिती देताना माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की कोळशाची आवश्यकता असलेला कोणताही देशांतर्गत खरेदीदार या लिलावात सहभागी होऊ शकतो. या धोरणाला मान्यता मिळाल्यानं भारताची ऊर्जा सुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि विकासाला गती देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरेल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या धोरणामुळे व्यवसाय करणे अधिक सोपे जाईल, देशांतर्गत उपलब्धता वाढेल आणि आयात केलेल्या कोळशावरील अवलंबित्व कमी होईल असंही मोदी यांनी म्हटलं आहे.

**नारळ**

आर्थिक घडामोडींवरील मंत्रिमंडळ समितीने 2026 हंगामासाठी खोबऱ्याच्या किमान आधारभूत किमतीलादेखील मंजुरी दिली. शेतकऱ्यांना किफायतशीर दर मिळावा यासाठी, सरकारने 2018-19 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा केली होती की, सर्व अधिसूचित पिकांची किमान आधारभूत किंमत अखिल भारतीय भारित सरासरी उत्पादन खर्चाच्या किमान दीडपट निश्चित केली जाईल. 2026 हंगामासाठी मिलिंग खोबऱ्याची किमान आधारभूत किंमत 445 रुपयांनी वाढवून 12 हजार 27 रुपये प्रति क्विंटल करण्यात आली आहे, तर याच कालावधीसाठी गोटा खोबऱ्याची किमान आधारभूत किंमत 400 रुपयांनी वाढवून 12 हजार 5 शे रुपये प्रति क्विंटल करण्यात आली आहे. यामुळे नारळाचे उत्पादन वाढण्याबरोबरच उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्नदेखील वाढण्यास मदत होणार आहे.

**एसआयआर**

निवडणूक आयोगाने आठ प्रमुख राज्यांमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावर देखरेख ठेवण्यासाठी विशेष मतदार यादी निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान या राज्यांमध्ये त्यांची नियुक्ती करण्यात आलं आहे. पुनरीक्षणाची प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकपणे पार पडेल याची खात्री करणे, हे त्यांचे कार्य असून निरीक्षक राज्य आणि जिल्हा दोन्ही स्तरांवर राजकीय पक्षांना भेटून त्यांची मते जाणून घेतील आणि पुनरीक्षण प्रक्रियेशी संबंधित अडचणी सोडवतील. संपूर्ण प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि सहभागात्मक पद्धतीने पूर्ण होण्यासाठी ते मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांसोबत बैठका घेतील. कोणताही पात्र मतदार वगळला जाणार नाही आणि कोणत्याही अपात्र व्यक्तीचा मतदार यादीत समावेश होणार नाही हे या निरीक्षकांचे मुख्य

काम राहणार असून फेब्रुवारी 2026 मध्ये अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध होईपर्यंत हे निरीक्षक प्रत्येक आठवड्यात दोन दिवस या राज्यांमध्ये उपस्थित राहणार असल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

**मोदी दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या तीन देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी जॉर्डनचे राजे अब्दुल्ला बिन अल हुसेन यांच्या निमंत्रणावरून येत्या 15 ते 16 डिसेंबर दरम्यान जॉर्डनला भेट देतील. भारत हा जॉर्डनचा तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. तर 16 ते 18 डिसेंबर दरम्यान मोदी अनुक्रमे इथिओपिया आणि ओमानला भेट देणार आहेत.

**जनगणना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत वर्ष 2027 मध्ये होणाऱ्या जनगणनेसाठीच्या आर्थिक तरतुदीला मंजूरी देण्यात आली. या डिजिटल जनगणनेसाठी 11 हजार 7 शे 18 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिल. देशातील ही पहिलीच संपूर्ण डिजिटल जनगणना असणार आहे. दोन टप्प्यात होणाऱ्या या जनगणनेसाठी 30 लाख कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचं सांगताना अश्विनी वैष्णव म्हणाले...

**सेंसर्स दो फेज में होगा। फेज ओने में फोकस रहेगा हाउसहोल्ड के अंदर क्या एमेनिटीज है, हाउसिंग कंडीशन कैसी है, कच्चा घर है, पक्का घर है, घर में कितने रूम्स है, किस तरह से घर में कोई वेहिकल है, घर में इलेक्ट्रिसिटी कनेक्शन कैसा है? थाट विल बे थे बसे फोर फेज त्वो जिसमें बहुत इम्पोर्टेंट है डेमोग्राफिक सोश कल्चरल एंड इकोनॉमिक पैरामीटर का इमशन किया जाएगा पूरी जनसंख्या का ये फेब्रुअरी ट्वेंटी ट्वेंटी सेवेन के हिसाब से किया जाएगा भारत के कानूनों के हिसाब से।**

जनगणना या मालिकेतील ही 16 वी आणि स्वातंत्र्यानंतरची 8 वी जनगणना असेल. या जनगणनेत जातनिहाय गणनेचादेखील समावेश असून माहिती संकलनासाठी मोबाईल ॲप्लिकेशन्सचा वापर केला जाणार असल्याचं वैष्णव यांनी म्हटलं आहे.

**संसद हल्ला**

2001 साली आजच्या दिवशी झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज 24 वर्ष पूर्ण झाली. संसदेचे रक्षण करताना प्राण गमावलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना आज संपूर्ण देशातून श्रद्धांजली वाहिली जात आहे. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय मंत्री आणि संसद सदस्य आज संसद भवन परिसरात हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहतील.

**वणवे**

भारताचा 'वणव्यांच्या जागतिक व्यवस्थापनाला बळकटी देणे' यावरील ठराव काल केनियातील नैरोबी येथे झालेल्या संयुक्त राष्ट्र पर्यावरण सभेच्या 7 व्या अधिवेशनात मंजूर करण्यात आला. या ठरावाचा उद्देश वणव्यांच्या व्यवस्थापनासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि समन्वित कृती मजबूत करणे हा आहे. या संदर्भातील जागतिक अहवालानुसार जर वणव्यांच्या सध्याचा कल असाच राहिला तर, 2030 पर्यंत वणव्यांमध्ये 14 टक्के, 2050 पर्यंत 30 टक्के आणि 2100 पर्यंत 50 टक्के वाढ होऊ शकते.

**अभाशुल्क**

अमेरिकन प्रतिनिधीगृहाच्या तीन सदस्यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्रीय आणीबाणीच्या घोषणेला रद्द करण्यासाठी एक ठराव मांडला आहे. ज्या ठरावामुळे भारताकडून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर 50 टक्क्यांपर्यंत शुल्क

लावणे शक्य झाले होते. या ठरावात या उपायांना बेकायदेशीर आणि अमेरिकन कामगार, ग्राहक आणि द्विपक्षीय संबंधांसाठी हानिकारक म्हटलं आहे. खासदार डेबोरा रॉस, मार्क वेसी आणि राजा कृष्णमूर्ती यांनी सांगितले की, ऑगस्टमध्ये आणीबाणीच्या अधिकारांतर्गत लादलेले शुल्क बेकायदेशीर असून ते अमेरिका-भारत संबंधांना नुकसानकारक असून यामुळे अमेरिकन ग्राहकांचा खर्च वाढत आहे. या ठरावाचा उद्देश 27 ऑगस्ट रोजी भारतीय वस्तूंवर लावलेले अतिरिक्त 25 टक्के दुय्यम शुल्क रद्द करणे हा आहे, जे पूर्वीच्या 25 टक्के शुल्काव्यतिरिक्त लावण्यात आले होते.

**<u>भाची</u>**

भारत आणि चीनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बीजिंगमध्ये चर्चेची नवीन फेरी झाली आहे. यामध्ये द्विपक्षीय संबंधांमधील सकारात्मक प्रगती करण्याच्या मुद्द्यावर जोर देण्यात आला. परराष्ट्र मंत्रालयाच्या पूर्व आशिया विभागाचे संयुक्त सचिव सुजित घोष यांनी काल बीजिंगचा आपला दोन दिवसांचा दौरा पूर्ण केला. या भेटीदरम्यान घोष यांनी चीनचे उप-परराष्ट्र मंत्री सन वेईदोंग यांची भेट घेतली आणि चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या आशियाई व्यवहार विभागाच्या महासंचालकांशी चर्चा केली. ही चर्चा रचनात्मक आणि भविष्यवेधी होती असं परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले. दोन्ही बाजूंनी आगामी वर्षासाठी नियोजित देवाणघेवाण आणि उपक्रमांचा आढावा घेतला. भारताने निर्यात नियंत्रणाशी संबंधित प्रलंबित समस्या लवकर सोडवण्याची गरज असल्याचे अधोरेखित करताना परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही यावेळी चर्चा झाली.

**<u>थायकंबो</u>**

थायलंड आणि कंबोडियाच्या नेत्यांनी, एका आठवडाभर चाललेल्या प्राणघातक सीमा संघर्षांनंतर, पुन्हा एकदा तात्काळ युद्धविराम कराराचे नूतनीकरण करण्यास सहमती दर्शवली असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं आहे. या संघर्षांमध्ये 20 लोकांचा मृत्यू झाला असून सुमारे पाच लाख लोकांना विस्थापित व्हावं लागलं आहे.

**<u>मेस्सी</u>**

फुटबॉलचा दिग्गज खेळाडू लिओनेल मेस्सी भारत भेटीवर आला असून कोलकातामधून त्याच्या भारत दौऱ्याची सुरुवात झाली असून त्याचं मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आलं. तो आपल्या बहुप्रतिक्षित 'गोट इंडिया टूर'ची सुरुवात करण्यासाठी भारतात आला आहे. त्याच्यासोबत लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डी पॉल हेदेखील खेळाडू आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

काल दुबई येथे झालेल्या 19 वर्षांखालील युवकांच्या आशिया क्रिकेट चषक स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात भारताने संयुक्त अरब अमिरातीचा 234 धावांनी पराभव केला. 434 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, संयुक्त अरब अमिरातीचा संघ 50 षटकांत 7 गडी गमावून 199 धावा करू शकला. प्रथम फलंदाजी करताना भारताच्या वैभव सूर्यवंशीने अवघ्या 95 चेंडूंमध्ये शानदार 171 धावांची खेळी केली. भारताचा पुढील सामना उद्या पाकिस्तानविरुद्ध होणार आहे.

**<u>स्क्वॅश</u>**

स्क्वॅश विश्वचषक स्पर्धेत चेन्नईमध्ये काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत भारतानं दक्षिण आफ्रिकेवर 3-0 असा सहज विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागाने उद्यापर्यंत उत्तर अंतर्गत कर्नाटकात थंडीची तीव्र लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. आज छत्तीसगड, तेलंगणा, दक्षिण अंतर्गत कर्नाटक आणि ओडिशा येथेही तीव्र थंडीच्या लाटेची स्थिती राहण्याची शक्यता आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.